● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

yuva.aadarsh@gmail.com
RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६ मंगळवार, दि २७ ऑगस्ट २०२४ https://yuvaadarsh.com

### नानसी पु येथील ग्रामस्थांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

## विकासात्मक कामे कागदोपत्री दाखवत लाखोंची बिले उचलली ; चौकशीची मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील. नानसी पु येथील नागरिकांचे गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन निवेदनात असे म्हटले आहे की नानसी पु येथे १५ वा वित्त आयोग व इतर विकासात्मक कामे केवळ कागदोपत्री दाखवून लाखो रुपयांचे बिल उचलून झालेल्या अपहाराची चौकशी करुन उर्वरीत कामे तात्काळ पूर्ण करणे व दोषी विरुध्द कडक कार्यवाही करण्यात यावी निवेदनात पुढे असे म्हटले आहे की आम्ही खालील सह्या करणारे नानसी येथील ग्रामस्थ असून आमच्या गावातील ग्राम पंचायतीवर प्रशासक आहे.सदरील प्रशासक व सचिव हे गावातील नागरीकांना विश्वासात न घेता त्यांच्या मनाने कामे दाखविले, ग्रामसभा बनावट रेकॉर्ड तयार करुन कामाचे खोटे व बनावट रेकॉर्ड तयार करुन त्या आधारे लाखो रुपयांचे बिल उचलण्याचे काम अनेक वर्षापासून चालू आहे. ज्यामध्ये खालील प्रमाणे अपहार झालेला आहे.

यामध्ये सन २0२0 ते २४ कालावधीमध्ये १५ वृत्त आयोग व इतर विकासात्मक का मी केवळ कागदोपत्री दाखवून लाखो रुपयांचे बिल उचलून लाखो रुपयांचा अपहार यात गावातील पाणीपुरवठा योजना करणे, व नळ जोडणे गावात पेव्हर ब्लॉक बसविणे, शाळा रंगरंगोटी व शौचालय दुरुस्ती करणे, लॅपटॉप खरेदी करणे, मागासवर्गीय वस्ती निधी, मेडिक्लोर बॉटल खरेदी करणे, गाव अंतर्गत बंदीस्त नाली करणे, सार्वजनिक सांडपाणी उपाय देवस्थान करणे अंडरग्राउंड नाली करणे, मागासवर्गीय वस्तीत पाणीपुरवठा करणे रस्ते व नाली करणे, गावात आयडीएम दर्जा टिकविण्यासाठी उपाययोजना करणे, पाणीपुरवठा दुरुस्ती बीज पंप व पाणी पुरवठा आर ओ फिल्टर बसविणे व दुरुस्ती, शासकीय इमारतीस रेन वॉटर हार्वे स्टिंग करणे, एम आर इ जी एस अंतर्गत विविध विकासकामे,जि.प शाळेत विद्यार्थ्यांना खेळण्याची साहित्य पुरवणी,जि.प शाळे करता गॅस खरेदी करणे,जि.प शाळी करिता इन्व्हर्टर खरेदी करणे, अंगणवाडी करिता स्वयंपाक भांडी खरेदी करणे फर्निचर खरेदी करणे, हात पंप ओटे दुरुस्ती करणे,जि.प शाळेत



शौचालय दुरुस्ती करणे, शाळा अंगणवाडी करिता हॅन्ड वॉश सेंटर उभारणी करणे, एम आर इ जी एस अंतर्गत विविध विकासकामे, साथ रोग उपाययोजना करणे, अंगणवाडी करिता साहित्य पुरवणी, मागासवर्गीय वस्तीत एलईडी लाईट बसविणे, सांडपाणी व्यवस्थापन करणे, पाणी पुरवठा योजना अंतर्गत अनुषंगिक कामे करणे,जि.प शाळेकर्ता साहित्य खरेदी करणे सदरील कामे ही प्रत्यक्षात करण्यात आलेलेच नाहीत फक्त कागदोपत्री काम दाखवून लाखो रुपयांचा अपहर करण्यात आला आहे व रिकामी झाले आहेत ते शंभर टक्के बोगस झाले आहेत. असा आरोप ग्राम स्थांनी निवेदनात केला आहे

सदरील प्रश्नी दिनांक २०/८/२०२४ रोजी प्रासमा आयोजीत करण्यात आलेली होती यावेळेस गावकन्यांनी वरील कामाविषयी विचारणा केली असता एकाही कामाचे रेकॉर्ड देण्यात आले नाही गावातील प्रोसिडीच बुक दाखविण्यात आले नाही ग्रामसभे मध्ये प्रशासक व सचिन पान ३ वर

## सेवलीतील शेकडो तरुणांचा आमदार लोणीकरांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षात प्रवेश

**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि महिला युवक युवती विद्यार्थी शेतकरी शेतमजूर बांधकाम कामगार अंगणवाडी सेविका सांगणक चालक



व वृद्ध नागरिकांच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वकांक्षी योजना केंद्र आणि राज्य सरकार राबवत असल्याने देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या कार्यकाळात झालेला सर्वांगीण विकास काम ाचा झपाटा अतिशय वेगाने चालू असल्यामुळे सेवली तालुका जालना येथील अनंता राऊत, गजानन राखे, विष्णू राऊत, शिवाजी राऊत, संतोष राऊत, गणेश पडूळ, गणेश जावळे, केशव सांगुळे, नेमनाथ म हिराळ, शिवा डाके, भोलेनाथ मोरे, लक्षमन हजारे, डीगांबर राऊत, दत्ता मोरे, दत्ता झोरे, अषीकेश काळे, कृष्णा निवरे, ज्ञानेश्वर घुले, सावता काळे, सोनू मोरे, संता काळे, अंकुश पवार, संतोष जाधव, भानुदास झोरे, राजू झोरे, गजानन डाके, संदीप पवार, अर्जुन हजारे, सोनू खंदारे, इंदर जावळे, उनाजी तिवरे, आनंद सेवलीकर भागवत काळे, गणेश पडूळ, प्रभाकर पडूळ यांच्या सह शेकडो युवकांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, लोकप्रिय लोकनेते परतूर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार मा. श्री बबनराव लोणीकर साहेब आणी भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव मा. श्री राहुलभैय्या लोणीकर यांच्या नेतृत्व स्वीकारून आज श्री भक्ती निवास यशवंत नगर जालना येथे भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यासाठी युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस विकास पालवे व सेवली ग्रामपंचायतचे माजी सदस्य समाधान वाघमारे यांनी मोठा पुढाकार घेतला होता. या प्रवेश सोहळ्याप्रसंगी भाजपा युवा मोर्चा जालना जिल्हाध्यक्ष संपत टकले भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास पालवे, मंठा भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विलास घोडके, स्वरूप सानप, संतोष गाढवे, समाधान वाघम ारे, राम पवार, संतोष खरात, सतीश खरात यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाकरे किड्स शाळेतील चिमुकले झाले राधा-कृष्ण; गोकुळाष्टमी साजरी



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील रामनगर, आझाद मैदान परिसरातील ठाकरे किड्स शाळेत गोकुळाष्टमी निमित्त बालगोपाळांनी कृष्ण व राधा यांचा पोशाख परिधान केले होते तर कृष्ण जन्म व काही नाटिका दाखवण्यात आल्या. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी लाह्या व मुरमुरे आणले होते त्यांचे एकत्रीकरण करून. कृष्णा भगवानाच्या लीला सांगण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील राजश्री माचेवार, मिनाक्षी आलकोंडा, ममता आडेप, ज्योती अग्रवाल, सौ. शहाणे, आदिती लोळगे, रसिका दीक्षित, वैष्णवी पोटा बत्तीन आदींनी परिश्रम घेतले. या प्रसंगी शाळेच्या संचालिका सौ. रंजना ठाकरे यांनी मुलांचे व शिक्षकांच्या परिश्रमाचे कौतिक केले.



शहरातील पंचमुखी महादेव मंदिर येथे श्रावण मासनिमित्त जल अर्पण करण्यासाठी व दर्शन साठी भाविकांची मोठी गर्दी होती. (छाया - जावेद तांबोली)

## मालवणमधील शिवरायांचा पुतळा पडल्याने शिवप्रेमींमध्ये संताप; राज्य सरकारचा निषेध



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौकात शिवप्रेमींनी आज दिनांक २६ सोमवार रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास आंदोलन करत राज्य सरकारचा निषेध केलाय. मालवणमध्ये वादळी वाऱ्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. त्याम ुळं राज्यभरात याचे पडसाद उमटायला सुरुवात झाली असून जालन्यातही शिवप्रेमींनी आंदोलन केलं आहे, व सरकार विरोधात आपला रोज व्यक्त केला आहे, याप्रसंगी शेकडो शिवप्रेमींनी जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात झालेल्या घटनेचा निषेध करत सरकार विरोधात जोरदार घोषणा देत निषेध व्यक्त केला आहे. ४ डिसेंबर २०२३ रोजी पान ३ वर

## शिवसेना सचिवपदी डॉ. संजय लाखे यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना सचिवपदी डॉ. संजय लाखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. संजय लाखे यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश करत शिवबंधन बांधले होते. त्यावेळी त्यांना पक्षात कुठलेही पद देण्यात आलेले नव्हते. परंतु काही संघटनात्मक जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. त्यांच्या संघटनात्मक कौशल्याचा व राजकीय अनुभवाचा फायदा व्हावा व त्यांना पक्ष संघटनेत सर्वार्थाने सक्रीय करण्यासाठी सचिवपद देण्यात आल्याचे समजते. विद्यार्थी दशेपासून काँग्रेसमध्ये विद्यार्थी काँग्रेस, युवक काँग्रेस, जिल्हा काँग्रेस, प्रदेश काँग्रेस आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीमध्ये विविध पदांवर व जबाबदाऱ्यांवर त्यांनी देशभर संघटनेत काम केले असून दहा - पंधरा वर्षांपासून पक्ष प्रवक्ते म्हणूनही अतिशय जबाबदारीने काम केले आहे. डॉ. लाखे पाटील हे अभ्यासू व्यक्तिमत्व असून, मराठा आरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, दुष्काळ निवारण, सिंचन हे विषय त्यांचे अभ्यासक्षेत्र आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांच्या वैविध्यपूर्ण अभ्यासाचा शिवसेनेसह महाविकास आघाडीला निश्चितपणे फायदा होऊ शकतो. या दृष्टीकोनातून या नियुक्तीकडे बघितले जात आहे. शिवसेनेत सचिव या अतिशय म हत्त्वाच्या पदावर निवडले गेलेले ते ग्रामीण भागातील व मराठवाड्यातील पहिलेच पान ३ वर

युवा आदर्श

### महिलागोविंदा ...

अग्रस्थानी चमकती
आता महिला गोविंदा
लीलया फोडली हंडी
आघाडी घेतली यंदा
कमी नाही नारी कुठे
सिध्दकरे पुन: एकदा
तोडे पुरुषी अहंकारां
जयकार करी कैकदा
शास्त्र शुध्द सरावाने
टाळली वेळी आपदा
नारी कौशल्य पाहता
परत पातली विपदा
खेळ नाही हा मुलींचा
जुमानले ना विरोधा
अडवणूक घराघरांतून
वेळेची आणली बाधा
सहज साध्य होणारा
खेळ नव्हता हा साधा
कृष्णासमान गोपिका
अव्वल बनल्या राधा
कमकुवत नसेवनिता
नका रे लागू बा नादा
झेंडा फडकवू सर्वत्र
नारीशक्तीचा हा वादा
दहीहंडी निमित्त मात्र
अवघड लक्षाला भेदा
महिलापुरुष सारखेचं
रे विसरावे आता भेदा

### दहीहंडी थर ..

दहीहंडी जाहिराती
झळकल्या गावभर
कुणाचे जास्ती थर
जीव झाला थर थर
बक्षीसांचा भडीमार
मोह होई अनावर
लुभावती नोटा त्या
छाप पडते मनावर
हौस पुरली नेत्यांची
बेते आमचे जीवावर
आमचे होऊ दे काही
प्रसिध्दी त्या नावावर
सेलिब्रिटी ते भारंभार
प्रभाव पडते सर्वांवर
गोपाळ ते कोपऱ्यात
कॅमेरे नसे त्यांच्यावर
तमाशगिरांचे गर्दीमधे
पडे गोविंदाचा विसर
उत्साहाच्या आनंदात
का वेदनेचा अडसर
खेळ होई आयुष्याचा
रेअपंगत्व आयुष्यभर
महोत्सवाले गालबोट
मोह फुकाचा पळभर
मिळणार विमाकवच
निर्णय भला खरोखर
आपण जपा आपणा
क्रिडा होईलं सुखकर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

# संपादकीय

## अजरामर पार्श्वगायक

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा आज स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गोपाळकाला

गोपाळकाला म्हटले की, उंचच्या उंच हंड्या आणि त्या फोडण्यासाठी जिवाचे रान करणारे तरुण डोळ्यांसमोर येतात; मात्र गोपाळकाला या सणाला आध्यात्मिक आणि पौराणिक पार्श्वभूमी असून ते शास्त्र लक्षात घेऊन साजरा केल्याने जिवाला त्याची अनुभूती घेता येते. गोपाळकाल्याचे अध्यात्मिक महत्त्व आणि त्याचे लाभ यांविषयीची माहिती या लेखातून जाणून घेऊया.

**'गोपाळकाला'चा अर्थ**

अ. श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोर्‍या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसर्‍या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.

आ. गोपाळकाला म्हणजे पांढर्‍या रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा अधिकाधिक प्रमाणात निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शवणारा आणि पूर्णावतारी कृष्णकार्याचे दर्शक असलेला समूच्चय. 'काला' हा शब्द एकसंध आणि वेगात सातत्य असणार्‍या क्रियेशी संबंधित आहे. 'काला' म्हणजे त्या काळाला, त्या स्थळाला, त्या त्या स्तरावर आवश्यक असे वैशिष्टपूर्ण कार्य दर्शवणार्‍या घटनांचे एकत्रिकरण.

पूर्णावतारी कार्य हे स्थळ, काळ आणि स्तर या तीनही घटकांवर आदर्शवत असेच असते. या कार्यप्रक्रियेत विविधांगी जीवनाचे पैलू आध्यात्मिकरीत्या ईश्वरी नियोजनाद्वारे मानवजातीसमोर लीलया उलगडून दाखवले



जातात. 'गोपाळकाला' हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रतिनिधित्व करतो.

**काल्यातील प्रमुख घटक**

पोहे, दही, दूध, ताक आणि लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत.

अ. पोहे : वस्तूनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक (काहीही झाले, तरी श्रीकृष्णाला धरून ठेवणारे सवंगडी)

आ. दही : वात्सल्यभावातून प्रसंगी शिक्षा करणार्‍या मातृभक्तीचे प्रतीक

इ. दूध : गोपींच्या सहज सगुण मधुरा भक्तीचे प्रतीक

ई. ताक : गोपींच्या विरोध भक्तीचे प्रतीक

उ. लोणी : सर्वांच्या श्रीकृष्णावरील अवीट प्रेमाच्या निर्गुण भक्तीचे प्रतीक

या दिवशी ब्रह्मांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्त्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

गोपाळकाला, गोपाळकाल्याची दिव्य चव आणि दहीहंडी फोडणे यांचा भावार्थ

अ. गोपाळकाला

दृश्य स्वरूपात गोपाळकाला म्हणजे कीर्तनानंतर किंवा गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी फोडून ग्रहण करतो, तो प्रसाद.

अ. गोपाळकाल्याची दिव्य चव

वरील सर्व पदार्थ एकत्र आणि एकजीव करून ग्रहण केल्यावर त्याची चव अवर्णनीय असते. त्याची चव अतिशय दिव्य असते.

इ. दहीहंडी फोडणे

दहीहंडी हे जिवाचे प्रतीक आहे. दहीहंडी फोडणे, हे जिवाने देहबुद्धी सोडून आत्मबुद्धीत स्थिर होणे, या अर्थाने आहे आणि दिव्य चव हे आनंदाचे प्रतीक आहे.

गोपाळकाल्याचे पावित्र्य राखण्यासाठी हे टाळा !

लाखो रुपयांच्या दहीहंडी स्पर्धा आयोजित करून केले जाणारे उत्सवाचे व्यापारीकरण !

उत्सवासाठी तंबाखू, गुटखा आदींची विज्ञापने किंवा त्यांच्या उत्पादकांचे प्रायोजकत्व !

या निमित्ताने होणारी वाटमारी, मद्यपान, बीभत्स नाच, पाण्याचे फुगे मारणे व महिलांची छेडछाड !

४० फुटांहून अधिक उंचीवरील दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांची धोकादायक कसरत !

हिंदुनो, गोपाळकाल्यातील अपप्रकार रोखण्यासाठी हे करा !

वाटमारी, महिलांची छेडछाड आदी अपप्रकार आढळल्यास पोलिसांत तक्रार करा !

गोकुळाष्टमी उत्सव मंडळांच्या पदाधिकार्‍यांना भेटून अपप्रकारांविषयी त्यांचे प्रबोधन करा !

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# ब्रिटिश राजवटीविरुद्धची सर्वात यशस्वी चळवळ!

स्वदेशी चळवळ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग होता आणि ज्यमुळे भारतीय राष्ट्रवादाच्या विकासास हातभार लागला. सन १९०६मध्ये बंगालच्या फाळणीला विरोध करणाऱ्या भारतीय नागरिकांनी २२ ऑगस्ट रोजी सुरू केलेली ही चळवळ ब्रिटिश राजवटीविरुद्धची सर्वात यशस्वी चळवळ होती. स्वदेशीवर महात्मा गांधींचा भर होता, ज्यांनी याचे वर्णन स्वराज्याचे सार असे केले. ही बंगालमधील सर्वात महत्त्वाची चळवळ होती आणि आंध्र प्रदेशात वंदे मातरम चळवळ म्हणून ओळखली जात होती. सन १९११मध्ये हे आंदोलन संपले. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींची सदर ज्ञानवर्धक लेखाची ही खास प्रस्तुती...

सन १९३०च्या लोकप्रिय पोस्टरमध्ये गांधींनी चरखा फिरविल्याचे चित्रित केले होते, चरखा आणि स्वदेशी यांच्यावर लक्ष केंद्रित करा, असे शीर्षक असलेले

बंगालचे विभाजन करण्याचा सरकारचा निर्णय डिसेंबर सन १९०३मध्ये झाला. या विभाजनाचे अधिकृत कारण असे होते की ७.८ कोटी लोकसंख्या असलेली बंगाल प्रशासनासाठी खूपच मोठी होती; तथापि खरे कारण ते होते की हे बंडाचे केंद्र होते आणि कंपनीचे अधिकारी हा विरोध नियंत्रित करू शकले नाहीत (जे त्यांना वाटले की ते संपूर्ण भारतभर पसरेल). बंगाल प्रांत धर्माच्या मुद्द्यावर विभागले गेले; पश्चिमी अर्धा भाग प्रामुख्याने हिंदू असेल आणि पूर्वार्ध हा मुख्यतः मुस्लिम असेल. या फाटा आणि जिंकण्याच्या रणनीतीने स्वदेशी चळवळीला उधाण आले. चळवळीचा इतिहास- सन १८५०-१९०४: दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे, बाळ गंगाधर टिळक, जी.व्ही. जोशी आणि भस्वत के. निगोनी यांनी भारतीय राष्ट्रवादाचा प्रचार करण्यासाठी (प्रथम स्वदेशी चळवळ) आयोजन करण्यास सुरुवात केली. सन १९०५-१९१७: बंगालच्या विभाजनास विरोध म्हणून चळवळीने विरोध केला, ज्याला लॉर्ड कर्झन यांनी आदेश दिले होते. सन १९१८-१९४७: महात्मा गांधींनी या चळवळीला आणखीनच आकार दिला आणि त्यामुळे ब्रिटिशांच्या राजवटीतून भारतीय स्वातंत्र्य मिळालं. सन १८७१-१८७२ च्या चळवळीने बंगाली व इतर भारतीयांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देण्यास प्रेरित केल्यामुळे शीख नामधारी पंथाच्या रामसिंह कुका यांना स्वदेशी चळवळ विकसित करण्याचे श्रेयही दिले जाते. कुका यांनी नामधाऱ्यांना फक्त भारतीय कपडे घालून परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याची सूचना केली. ब्रिटिश कायदा आणि न्यायालये बाजूला ठेवून नामधाऱ्यांनी लोकांच्या कोर्टात हा संघर्ष मिटविला. त्यांनी शैक्षणिक प्रणालीवर बहिष्कार टाकला कारण कुकाने मुलांना ब्रिटिश शाळांमध्ये जाण्यास मनाई केली होती.

प्रभाव- सन १९९९च्या लेखानुसार गांधींच्या स्वदेशी या संकल्पनेवर ईएफ शुमाकर- स्मॉल इज ब्युटीफुलचे लेखक प्रभावित झाले. ऑगस्ट २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशी हातमाग आणि खादी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी भारतातील पहिल्या वार्षिक राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त हा दिवस साजरा केला. ही तारीख निवडली गेली, कारण दि.७ ऑगस्ट १९०५ रोजी स्वदेशी चळवळीची घोषणा विदेशी माल टाळण्यासाठी व केवळ भारतीय निर्मित उत्पादने वापरण्यासाठी केली गेली. सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमाचा भाग म्हणून आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी २०१७मध्ये स्वदेशी शॉपिंगला- लघु आणि मध्यम आकाराचे उद्योग, भारत- लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांचे बाजार म्हणून प्रोत्साहन दिले.

स्वदेशी आंदोलनः परदेशी मालावर बहिष्कार घालण्यासाठी छेडलेले आंदोलन. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या विशिष्ट राजकीय व आर्थिक परिस्थितीत त्याला चालना मिळाली कारण अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात यूरोपमध्ये, विशेषतः इंग्लंडमध्ये, औद्योगिक क्रांती सुरू होऊन नव्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार होणार्‍या मालाला बाहेर बाजारपेठा मिळविणे आवश्यक होते. त्यातून कारखानदार कच्च्या मालासाठी परदेशांतील बाजारपेठा काबीज करू लागले. साहजिकच यूरोपीय राष्ट्रांत, विशेषतः ग्रेट ब्रिटनमध्ये कच्च्या मालाची उगमस्थाने व बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी संघर्ष उद्भवला. त्यातून ग्रेट ब्रिटनमधून पक्का माल उदा., कापड भारतात येई व येथून कवडीमोल किंमतीला कच्चा माल- कापूस ग्रेट ब्रिटनला जाई. तेव्हा या कापडावर बहिष्कार टाकण्याची मोहीम लोकहितवादी, सार्वजनिक काका, दादाभाई नवरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी सुरू केली आणि स्वदेशी माल- विशेषतः खादीचे कापड वापरण्यासाठी आग्रही भूमिका स्वदेशी आंदोलनाद्वारे व्यक्त केली. इतर यूरोपियन देशांप्रमाणे ब्रिटिशही भारतात व्यापार करण्यासाठी आले. भारताची बाजारपेठ आपल्या ताब्यात कायम राहावी म्हणून ब्रिटिशांनी येथे राज्य स्थापून स्वतःसाठी फायदेशीर अशी धोरणे आखली. इंग्लंडच्या कारखान्यांतील माल सुबक व स्वस्त असे. भारतातील हातमाग उद्योगाशी स्पर्धा करता यावी यासाठी जकात, मजुरी व इतर अनेक बाबतींत तेथील कारखानदारांसाठी ब्रिटिश शासनाने अनुकूल धोरणे स्वीकारली. यामुळे भारतीय उद्योगधंदे बुडू लागले, कारागीर बेरोजगार होऊन त्यांचे व पर्यायाने एकंदर समाजाचे दारिद्र्य वाढू लागले. ही घसरगुंडी थांबवायची असेल, तर भारतीयांनी भारतातच तयार झालेला माल वापरावा, असे धोरण काही जणांनी पुरस्कारिले. स्वदेशी माल महाग असे. तो जाडाभरडा असला, तरी देशाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने तोच वापरला पाहिजे, असा प्रचार स्वदेशीचे पुरस्कारकर्ते करू लागले. पुढे टिळकांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चतुःसूत्रीत स्वदेशी मालाचा स्वीकार व परदेशी मालावर बहिष्कार या कार्यक्रमांचा अंतर्भाव केला आणि आपली उन्नती करून घ्यावयाची ती स्वदेशी आणि बहिष्कार यांसारख्या मार्गांनीच केली पाहिजे, असे निक्षून सांगितले. तत्पूर्वी १८९४-९६ च्या इंग्रजांच्या जकातविषयक धोरणामुळे साम्राज्यशाही शोषणाचे स्वरूप अधिक स्पष्ट झाले होते. त्यामुळे स्वदेशीला जनतेचा पाठिंबा वाढत गेला. सन १९०६मध्ये तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी करण्याचा घाट घातला. त्याविरुद्ध बंगालमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. टिळकांनी या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून दिले. ब्रिटिश शासनाविरुद्धची चळवळ तीव्रतर बनविली पाहिजे, अशी जाणीव काँग्रेसच्या बहुतेक पुढार्‍यांना झाली. कलकत्ता येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात दादाभाई नवरोजी यांनी अध्यक्षपदावरून स्वदेशीचा पुरस्कार केला आणि अधिवेशनात संमत झालेल्या ठरावातही स्वदेशी व बहिष्कार यांचा अंतर्भाव करण्यात आला. या आंदोलनात जमीनदार व वकिलांसोबत विद्यार्थी, शेतकरी, दुकानदार, एतद्देशीय सैनिक, पुजारी, नाभिक, परीट इत्यादींनी सहभागी होऊन परदेशी मालावर बहिष्कार तर टाकलाच पण इंग्लिश समाजाबरोबरचे रोटीबेटी व्यवहारसुद्धा बंद केले. विद्यार्थ्यांच्या चिथावणीला पायबंद घालण्यासाठी ब्रिटिश शासनाने शैक्षणिक संस्थांना अशा विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच स्थानिक जमीनदारांवरही दबाव आणला. मुसलमानांना काही सवलती देऊन हिंदूंविरुद्ध चिथविले. शिवाय मिरवणुका, सभा आणि वृत्तपत्रे यांवर काही निर्बंध घातले. अखेरचे अस्त्र म्हणून आंदोलन मोडण्यासाठी चौकशी- शिवाय नेत्यांना तुरुंगात डांबण्याचे सत्र ब्रिटिशांनी अवलंबिले तथापि स्वदेशी आंदोलक डगमगले नाहीत. त्यांनी परदेशी कापड, मीठ, साखर इत्यादींवरील बहिष्कार चालू ठेवला. त्यांनी शपथपूर्वक इंग्रजी भाषेचा त्याग केला. शासकीय मंडळे आणि समित्यांतून अनेक निष्ठावान नेते राजीनामा देऊन बाहेर पडले. एवढेच नव्हे, तर इंग्रजांची कोणतीही सेवा वा नोकरी करायची नाही, असे कार्यकर्त्यांनी ठरविले. जो कोणी इंग्रजांना मदत करील, त्याच्याकडे समाज उपहासात्मक दृष्टीने पाहू लागला. या काळात सरकारी शिक्षण हे शासकीय नोकर बनविणारे असल्याने त्याऐवजी राष्ट्रीय शिक्षण देणार्‍या संस्था स्थापन कराव्यात, अशी काँग्रेस अधिवेशनांतून घोषणा करण्यात आली.

याच सुमारास भारतीय कारखानदारी वाढू लागली होती. ब्रिटिश शासनाच्या साम्राज्यशाही धोरणाचा या कारखानदारांना अडथळा होऊ लागला. म्हणून त्यांनी स्वदेशी आंदोलनाला, पर्यायाने काँग्रेसच्या चळवळीला पाठिंबा दिला. पुढे महात्मा गांधींनी स्वदेशीला खादी ग्रामोद्योगाची जोड दिली. स्वदेशी मालाचा अभिमान हे राष्ट्रप्रेमाचे लक्षण बनले. १२ डिसेंबर १९३० रोजी परदेशी कापडाचा मालवाहू ट्रक अडविण्यासाठी मुंबईचा एक कामगार बाबू गेनू ट्रकसमोर आडवा झाला ट्रक त्याच्या अंगावरून बेमुर्वतखोरपणे नेला गेल्याने त्याला आपले प्राण गमवावे लागले. बाबू गेनूच्या हौतात्म्यामुळे अनेकांना देशप्रेमाची व स्वदेशीची स्फूर्ती मिळाली. स्वदेशी चळवळ आरंभ दिन चिरायू होवो !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# शहीद पुरूष आणि स्त्रियांच्या स्मृतिंचा सन्मान!

संयुक्त राष्ट्रसंघाच्या युनोस्कोतर्फे दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस गुलाम व्यापार आणि त्याच्या उन्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय स्मरणदिन अथवा आंतरराष्ट्रीय गुलामगिरी उन्मूलन दिन म्हणून पाळला जातो. सर्व लोकांच्या स्मृतीत गुलामगिरीत व्यापाराची शोकांतिका लिहिण्यासाठी हा दिवस आयोजित केला जातो. हा दिवस त्या पुरूष आणि स्त्रियांच्या स्मृतिचा सन्मान करण्याचा आहे. ज्यांनी सन १७९१मध्ये सेंट-डोमिंग्यू- हैतीमध्ये गुलामगिरी आणि अमानुषपणे समाप्तीचा मार्ग मोकळा केला. हा दिवस पहिल्यांदा अनेक देशांमध्ये, विशेषतः हत्तींच्या दिवस.२३ ऑगस्ट १९९८ आणि २३ ऑगस्ट १९९९ रोजी सेनेगलमधील गोरी येथे आयोजित करण्यात आला होता.

सुरुवातीला गुलामगिरी केवळ अमेरिकेच्या दक्षिणी राज्यांमधेच नव्हती, तर उत्तर क्षेत्रातही होती. व्हरमाँट गुलामगिरीचे उच्चाटन करण्यासाठी प्रथम राज्य म्हणून अस्तित्वात आहे, सन १७७७मध्ये अमेरिकेने ब्रिटनमधून स्वतःला मुक्त केल्या नंतर ती सुरू झाली. तब्बल सात वर्षांनंतर सर्व उत्तर राज्ये गुलामगिरीत बंदी घालण्याची शपथ घेतली. पण उत्तर प्रदेशात बऱ्याच वर्षे गुलामगिरीचा अभ्यास चालूच होता. याचे उत्तर असे की उत्तर अमेरिकेने या कायद्याची अंमलबजावणी केली ज्यामुळे गुलामगिरीचे उन्मूलन तात्काळ बदलता आले नाही.

पीबीएसने असे सुचवले, की पेनसिल्वेनियाने सन १७८०मध्ये गुलामगिरीच्या क्रांतीदिनासाठीच्या कायद्याची अंमलबजावणी केली, परंतु हळूहळू एक कमी सांगण्यात आले. सन १८५०मध्ये पेनसिल्वेनियाच्या शेकडो बंदिवानांना बंधनात राहणे चालूच राहिले. सन १९६१मध्ये गृहयुद्ध सुरू होण्याआधीच एका दशकाहून अधिक काळाने उत्तर प्रदेशात दासत्त्व सुरूच राहिले. गुलामगिरी निर्मूलन कायदा- १८३३अनुसार ब्रिटीश इतिहासातील संसदेचा कायदा ज्याने बहुतेक ब्रिटिश वसाहतींमधील गुलामगिरी रद्द केली, कॅरिबियन आणि दक्षिण आफ्रिकेतील आठ लाखाहून अधिक गुलाम आफ्रिकन तसेच कॅनडामधील थोड्या संख्येने मुक्त केले. याला दि.२८ ऑगस्ट १८३३ रोजी रॉयल मान्यता मिळाली आणि दि.१ ऑगस्ट १८३४ रोजी लागू झाली. हा कायदा मंजूर होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरले. त्यावेळी ब्रिटनची अर्थव्यवस्था प्रवाही होती आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची एक नवीन प्रणाली उदयास आल्याने, त्याच्या गुलामगिरीच्या कॅरिबियन वसाहती, ज्या मुख्यत्वे साखर उत्पादनावर केंद्रित होत्या. यापुढे क्युबा आणि ब्राझीलसारख्या मोठ्या वृक्षारोपण अर्थव्यवस्थांशी स्पर्धा करू शकल्या नाहीत. व्यापाऱ्यांनी कॅरिबियन वसाहतींच्या ताब्यातील ब्रिटीश बाजारपेठेतील मक्तेदारी संपुष्टात आणण्याची मागणी करण्यास सुरुवात केली आणि त्याऐवजी मुक्त व्यापारासाठी दबाव आणला. गुलाम बनवलेल्या आफ्रिकन लोकांचे सततचे संघर्ष आणि वृक्षारोपण मालकांमधील गुलाम उठावांची वाढती भीती हे आणखी एक प्रमुख कारण होते. जोसेफ तुस्कानो, गुलामगिरी हा संघटित गुन्हा आहे व जगभरात त्याचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न, पूर्वकाळापासून होत आले आहेत. तरीही, अजून ही प्रथा जगात अस्तित्वात आहे व नवनव्या स्वरूपात रूढ होत आहे. गरीब मुलांचा आणि गरजू स्त्रियांचा व्यापार करून, त्यांना कष्टांच्या कामाला जुंपणे, लैंगिक भुका भागविण्यास वापरणे, जबरदस्ती करून त्यांच्याकडून विविध नीच दर्जाच्या कामे करवून घेणे; ही गुलामगिरीची नवी आवृत्ती होय. सन १९४९ साली संयुक्त राष्ट्रांनी या दिवसाची घोषणा करून, कुठल्याही स्वरूपाच्या गुलामगिरीचे जगभरातून उच्चाटन व्हावे म्हणून आवाहन केले होते. त्यानंतर २००२ हे साल आंतरराष्ट्रीय वर्ष या कार्याची स्मृती म्हणून जाहीर झाले होते. त्याही पुढे २००७ पासून २५ मार्च हा दिवस या प्रथेला बळी पडलेल्या दुर्दैवी जीवांच्या स्मरणार्थ राखून ठेवला होता. या दिवशी सृजनमंडळी कथा-कवितांतून मुलाखतीद्वारा व अन्य प्रसारमाध्यमांचा वापर करून गुलामगिरीच्या कथा नि व्यथा मांडीत असतात. आकाशवाणी, दूरचित्रवाणी माध्यमातून मानवी हक्कांचा ऊहापोह करतात. बातमीपत्रे, पत्रके वाटून तसेच जागोजागी मोठमोठे फलक लावून गुलामगिरीचा काळीमा जनतेच्या लक्षात आणून दिला जातो.२ डिसेंबर २००९ च्या संदेशात युनोचे सरचिटणीस बान की मून म्हणाले होते त्यानुसार, गुलामगिरीचे उच्चाटन केवळ कायद्याने होणार नाही. या मोहिमेत गरिबी हटाव, साक्षरता प्रसार, लैंगिक समानता, हिंसेचे उच्चाटन हे कार्यक्रमदेखील अंतर्भूत व्हायला हवेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या युनोस्कोतर्फे दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस गुलाम व्यापार आणि त्याच्या उन्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय स्मरणदिन अथवा आंतरराष्ट्रीय गुलामगिरी उन्मूलन दिन म्हणून पाळला जातो. सर्व लोकांच्या स्मृतीत गुलामगिरीत व्यापाराची शोकांतिका लिहिण्यासाठी हा दिवस आयोजित केला जातो. हा दिवस त्या पुरूष आणि स्त्रियांच्या स्मृतिचा सन्मान करण्याचा आहे. ज्यांनी सन १७९१मध्ये सेंट-डोमिंग्यू- हैतीमध्ये गुलामगिरी आणि अमानुषपणे समाप्तीचा मार्ग मोकळा केला. हा दिवस पहिल्यांदा अनेक देशांमध्ये, विशेषतः हत्तींचा दिवस होता. पुढे दि.२३ ऑगस्ट १९९८ आणि २३ ऑगस्ट १९९९ रोजी सेनेगलमधील गोरी येथे आयोजित करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिवसानिमित्त समस्त बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे, रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हादगाव येथील युवकांचा शिवसेनेत प्रवेश

**परतुर । प्रतिनिधी -** तालुक्यातील कोकाटे हादगाव सर्कल मधील को - हादगावातील युवकांचा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज परतुर येथील शिवसेना जिल्हा कार्यालय येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेनेचे अग्रवाल यांनी कोकाटे हादगाव येथील युवकांचा शिवसेनेत प्रवेश करून घेतला याप्रसंगी अग्रवाल यांनी सांगितले की, बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्ववादी विचार व आनंद दिघे यांची शिकवणीचा प्रसार



प्रचार गावागावात झाला पाहिजे व गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक निर्माण करावा आपण म ाझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊदेणार नाही अशी या ठिकाणी ग्वाही देतो तसेच शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य पर्यंत आपण पोहोचवावे असेही शेवटी अग्रवाल यांनी सांगितले. यावेळी शहर प्रमुख दीपक हिवाळे व वैद्यकीय कक्षाचे कैलास चव्हाण उपस्थित होते. शिवसेनेत जाहीर प्रवेश करणाऱ्यामध्ये राम सुरेश दगडू चव्हाण, रामा मानू राठोड,राजेभाऊ श्रीराम चव्हाण,महादेव छगन चव्हाण दगडूबा चव्हाण, राम मनू राठोड, राजेभाऊ श्रीराम चव्हाण, महादेव चव्हाण ,नाम देव शामराव चव्हाण ,विलास भानुदास राठोड, अंकुश राठोड, नारायण कृष्णा राठोड, सुभाष नमो चव्हाण, सुनील सुरेश चव्हाण, शिवाजी मानू राठोड, आकाश सुखदेव चव्हाण, भारत बाबू राठोड, पिंटू श्रीराम चव्हाण, मिथुन नारायण राठोड, लखन कृष्णा राठोड, विनोद राम राठोड, काळू भानुदास राठोड, लहू श्रीराम राठोड, भाऊ शामराव राठोड, सिद्धार्थ सुरेश चव्हाण, यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला

# रॉयल्स आणि डायमंड क्लबच्या नूतन कार्यकारिणीचा लॉयन्स क्लबतर्फे सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब जालना रॉयल्स व लायन्स क्लब ऑफ जालना डायमंडच्या पदग्रहण सोहळ्यात माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांनी जालन्यात क्लबच्या माध्यम ातून वृद्धाश्रम रॉयल्स क्लबचे नूतन अध्यक्ष विनयकुमार कोठारी यांनी नेत्रालय हे दोन स्थायी प्रकल्प उभारण्याचा संकल्प केल्याबद्दल जालना लॉयन्स क्लबच्यावतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

लॉयन्स क्लबने दोन वर्षांपूर्वी परतूर येथे लॉयन्स नेत्रालय स्थापन करून सेवा कार्यात एक मोलाची भर घातलेली आहे. माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांनी या पुढचे पाऊल म्हणून जालना शहरात वृद्धाश्रम स्थापन करण्याचा तर रॉयल्सचे नूतन अध्यक्ष विनयकुमार कोठारी यांनी लॉयन्स नेत्रालय स्थापन करण्याचा संकल्प केला आहे. हे दोन स्थायी प्रकल्प जालना शहराच्या ५८ वर्षांच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. माजी प्रांतपाल जयपुरीया, रॉयल्स क्लबचे अध्यक्ष विनयकुमार कोठारी, सदस्य मुरारीलाल गुप्ता, सुशील पांडे, राजेश कामड, डॉ. रवीप्रकाश उजवणे, शिवकुमार बैजल, जतिन अग्रवाल, श्री. कुलकर्णी, गजानन सारस्वत, डायमंड क्लबचे नूतन अध्यक्ष कपिल गजबी, सुभाष देवीदान, राजेंद्र बजाज, सुनील बियाणी, ललित बीजावत यांनीही या नव्या कार्याला हातभार लावण्याचे आश्वासन दिले. याबद्दल लायन्स क्लबच्यावतीने नियोजित स्थायी प्रकल्पांना म ाजी प्रांतपाल विजय बगडिया, विभागीय अध्यक्ष संजीव गुप्ता, लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, मंजू श्रीमाली, अतुल लड्ढा, बाला भक्कड, जयप्रकाश श्रीमाली, प्रमोद रुणवाल, विजय दाड, जगत घुगे, दिनेश लोहीया, श्याम लोया, रतन बजाज, द्वारकादास मुदंडा यांनी शुभेच्छा देऊन सत्कार केला.

# डॉ.कुमार सुरवसे यांना औषध निर्माण शास्त्रामध्ये पीचडी प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** गेवराई तालुक्यातील मौजे गढी येथील शेतकरी कुटुंबातील रहीवाशी असलेले डॉ.कुमार सुरवसे यांना नुकतीच औषध निर्माण शास्त्रामध्ये पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.

डॉ.कुमार सुरवसे हे बाभुळगाव यवला येथील मातोश्री शिक्षण संस्थेचे एम.ए.बी.डी. इंन्स्टुट ऑफ फॉर्मासिटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, औषध निर्माण शास्त्र प्रमुख म्हणुन सध्या कार्यरत आहे.

डॉ. कुमार सुरवसे यांना ओरिएंन्टल विद्यापीठाने पीएचडी प्रदान केली आहे.

त्यांनी ईमीडाझोलो-ॲझेटिडीनोन डेरिव्हेटिव्हन यांचे सिंथेसीस करून त्याचा उपयोग अनेक आजारास कारणीभुत असणार्या बॅक्टीरिया यांचा प्रतिबंध करण्यास व वेदनाशमक औषधी म्हणून उपयोगी ठरणार आहे. डॉ.सुरवसे यांनी मागील सहा वर्षापासून यावर संशोधन करून शोध प्रबंध ओरिएन्टल विद्यापीठास सादर केला. त्यांचा



या शोध प्रबंधाची विद्यापीठाने दखल घेऊन त्यांना पीएचडी प्रदान केली आहे. त्यांच्या या यशासाठी त्यांनी डॉ. निहारिका गोखले, डॉ. तिवारी, डॉ.सचिन जैन आदींनी मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे त्यांच्या कार्यास पुर्वत्वाकडे नेण्यास त्यांची धर्मपत्नी सौ.मिनाक्षी सुरवसे यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे बीड जिल्हा तालुका गेवराई मौजे गडी येथील नातेवाईक-मित्रमंडळ तसेच सगेसोयरे यांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची २९ रोजी आढावा बैठक

**जालना -** जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची आढावा बैठक दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेली असून यामध्ये ज्या अर्जदारांना शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द भ्रष्टाचार/गैरव्यवहार/अफरातफर/विलंब तक्रार द्यावयाची असेल त्यांनी संबंधित तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे अथवा जिल्हा भ्रष्टाचार निम ूलन समितीकडे सबळ पुरावे सादर करुन तक्रार देण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# परतूर मध्ये महाविकास आघाडीच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**परतूर । प्रतिनिधी -** कोपर्डी, पुणे, मुंबई, संभाजीनगर(औरंगाबाद), बीड, नागपूर, लातूर सिंदखेड राजा या सह महाराष्ट्रातील विविध ठिकाणी अनेक बलात्कारांचे प्रकरण झाले त्यात बदलापूर प्रकरणी चिमुकल्या मुलींवर अनेकदा अत्याचार झाले हा अहवाल धक्कादायक आहे. संबंधित संस्थाचालकांनी हे प्रकरण दाबण्याचा अतोनात प्रयत्न केला. यात पोलीस प्रशासन सुद्धा या जुलमी सरकारच्या इशाऱ्यावर काम करत होते.

शिवाय न्यायासाठी आंदोलन करणाऱ्यांवर ही सरकार गुन्हे दाखल करते, ही कोणती वृत्ती आणि कोणती प्रवृत्ती राज्यात वाढीस लागली आहे ? हाच का विकसित भारत ? आणि हेच का अच्छे दिन ?सद्यस्थितीत राज्यातील कायदा सुव्यवस्थेची अवस्था अत्यंत गंभीर आहे. हे सरकार टक्केवारीत गुंतले आहे. त्यांना प्रशासन चालविण्यात, राज्यकारभार करण्यात आणि राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यामध्ये हे तिघाडी म हायुती सरकार सपशेल फेल ठरलेले आहे. असे या वेळी मा. आ. सुरेशकुमार जेथलिया म्हणाले उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा आदर राखून महाविकास आघाडीने संवैधानिक मार्गाने आज राज्यभर जना आंदोलन पुकारले. आहे त्याचाच भाग म्हणून

परतूर मध्येच ही महाविकास आघाडी ने आंदोलन करीत उपविभागीय अधिकारी यांनां निवेदन दिले यावेळी.




मा.आ.सुरेशकुमार जेथलिया यांच्या सह शिवसेना उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम,युवा नेते महेश भैया नळगे, शिवसेना तालुका प्रमुख सुदर्शन बप्पा सोळंके काँगेस तालुका अध्यक्ष बाबाजी गाडगे,बाबासाहेब तेलगड,नगरसेवक रहमुशेठ कुरेशी, बाबुराव हिवाळे, राजेश भुजबळ,सिद्धार्थ बंड,जि. प. सदस्य इंद्रजित घनवट,लक्ष्मण शिंदे,काँग्रेस जिल्हाउपाध्यक्ष हाजी रहेमात खान,एकनाथ कदम,दत्ता पवार, दत्ता अंभुरे,खोत, भारसाकळे,नाम देव सर धुमाळ,शिवसेना शहरप्रमुख दत्ता पाटील सुरुंग,काँगेस शहर अध्यक्ष वैजनाथ बागल,दलीत आघाडी ता. प्रमुख मधुकर पाईकराव, शिवसेना उपतालुका प्रमुख प्रदीप ठोके, अल्पसंख्याक तालुका प्रमुख उस्मान शेख, सरपंच सुनील तायडे, युवासेना समन्वयक राहुल कदम, माजी सरपंच विठ्ठलराव ठोंबरे, उपसरपंच दिपक काळे, उपसरपंच सत्यवान धुम ाळ,नारायण भिसे,विभागप्रम ुख तुकाराम बोरकर,गोरखनाथ ठोंबरे,योगेश गाते,राजेश चव्हाण,माऊली तनपुरे शाकेर भाई,अविनाश शहाणे,मोसिन बागवान, मनोज कर्हाळे,आदी ची उपस्थिती होती.

# मौजे अंतरवाला येथे भास्कर दानवे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या मौजे अंतरवाला ता. जि. जालना येथील विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या हस्ते करण्यात आले.

जवळपास १ कोटी ८७ लाख रुपयांचा निधी २०२३-२४ या वर्षामध्ये आपल्या अंतरवाला गावासाठी मा. रावसाहेबदादा दानवे यांनी उपलब्ध करून दिला आहे आणि ही विकासकामे इथेच थांबणार नसून यापुढेही गावात ही विकासाची गंगा अशीच वाहात राहिल निवडणुकीत ज्या गोष्टी घडल्या त्या मागे ठेऊन गेली २५ वर्ष तुम्ही गावकऱ्यांनी जे प्रेम आणि विश्वास दाखवला यापुढेही असेच रहुद्या असे प्रतिपादन यावेळी बोलताना भास्कर आबा दानवे यांनी केले.

अंतरवाला गावासाठी २५१५ योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कानिफनाथ मंदिरासमोर सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रूपये, सरस्वती व्यायाम शाळे समोर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष रुपये, समाज मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ५ लक्ष रुपये, विठ्ठल रुख्मिणी मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे यावेळी या सर्व कामांचे भूमीपूजन करण्यात आले त्याच प्रमाणे २५०५ योजनेंतर्गत मारोती मंदिरासमोर बसविण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉक साठी १० लक्ष रुपये, जलजीवन मि शन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी ३५ लक्ष रुपये या झालेल्या कामांचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.



याप्रसंगी युवा मोर्चाचे जिल्हाअध्यक्ष भागवतबापू बावणे, मुकेशजी चव्हाण, विष्णू डोंगरे, निवृत्ती लंके, कृष्णा गायके, उद्धव ढवळे, मदनजी गव्हारे, शिवाजी गव्हारे, बळीराम शिंदे, सुधाकर शिंदे यांच्यासह अनेक भाजप पदकधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ व ४ वरुन

## विकासात्मक कामे ...

यांनी धमकी दिले ओराची केली आणि जा तुम्हाला कोणाकडे जायचे तर जा आमचे काही वाकडे होत नाही आम्हाला देखोल वरच्या अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतात त्यामुळे आम्हाला काही फरक पडत नाही आम्ही कागदोपत्री रेकॉर्ड तयार करुन ठेवूत आणि वेळ प्रसंगी काय करायचे ते करुत असे संबधीत ग्रामसेवक यांनी सांगीतले आहे.

तेंव्हा आपणास नम्र विनंती की, सदारील विषयी आपण स्वतः काम निहाय व वर्ष निहाय वरील कामाची प्रत्यक्ष पाहणी समस्त गावकऱ्यां समक्ष करुन दोषी विरुध्द तात्काळ कार्यवाही करण्यात यावी नसता आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल याची नोंद घ्यावी. या निवेदनावर सिद्धेश्वर निर्वळ माणिक निर्वळ नितीन निर्वळ विष्णू निर्वळ गंगाधर बोने अजय वटाणे अंकुश बोने प्रदीप वाटुरे सुदाम घोडे सतीश निर्वळ शुभम बोने प्रल्हाद घोडे हबीब पठाण आदी व्यक्तींच्या सह्या आहेत.

## मालवणमधील शिवरायांचा...

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते मोठ्या थाटात व जल्लोषात सरकारने गाजावाजा करत या पुतळ्याचे अनावरण केले मात्र या पुतळ्याचे सर्व काम उत्कृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे आणि वादळी वाऱ्यामध्ये हा पुतळा जमीनदोस्त झाला आहे, एकीकडे सरकार पुतळा उभारून पुन्हा तो वादळी वाऱ्याने पडल्याने सरकार विरोधात शिवप्रेमी मध्ये राज्यभरातून नाराजी व्यक्त केली जात आहे. कारण या पुतळ्याचे उद्धाटन चक्क देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे मग या पुतळ्याचे काम चांगल्या दर्जाचे का नाही करण्यात आले असा सवाल यावेळी शिवप्रेमींनी उपस्थित करत सरकार विरोधात आपला रोष व्यक्त केला आहे.

यावेळी विश्वंभर तिरुके, नन्नू भाई कांबळे, रोहित देशमुख, प्रदीप जाधव, विशाल वाघमारे, मधुकर शेंडगे, सोपान तिरुखे, अर्जुन घारे, विशाल इंगळे, बाळासाहेब डाके, अमोल नागवे, नितीन जाधव, नारायण पडूळ, आकाश गायकवाड सह मराठा बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## शिवसेना सचिवपदी ...

पदाधिकारी आहेत. ग्रामीण भागात शिवसेना अधिक दृढ करण्यासाठी डॉ. लाखे पाटील साह्यभूत ठरणार आहेत.

या निवडीबद्दल व नियुक्ती बद्दल त्यांनी पक्षप्रमुख ऊध्दव ठाकरे आणि सौ. रश्मीताई ठाकरे, युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, आ. मिलिंद नार्वेकर, खा. अनिल देसाई, सुभाष देसाई, दिवाकर रावते, आ. अनिल परब, विनायक राऊत, आ. भास्कर जाधव, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खा. चंद्रकांत खैरे, श्रीमती सूष्माताई अंधारे, आ. सुनिल प्रभू, खा. अरविंद सावंत, विभागीय समन्वयक विश्वनाथ नेरूरकर, माजी आ. विनोद घोसाळकर, खा. ओम राजे निंबाळकर, खा. बंडू जाधव, आ. कैलास पाटील, प्रविण पंडित, अशोक पटवर्धन, माजी आ. किशनचंद तनवाणी, म ाजी आ. शिवाजीराव चोथे, लक्ष्मण वडले, श्रीमती ज्योतीताई ठाकरे आदिंसह पक्ष संघटनेच्या नेत्यांचे, शिवसैनिकांचे त्यांनी आभार मानले आहेत.

# चमनचा राजा गणेश मंडळातर्फे गोरे, पांगारकर यांचा सत्कार!

**जालना । प्रतिनिधी -** येथील सुप्रसिध्द चमनचा राजा गणेश मंडळातर्फे गणेश फेस्टीवलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे आणि गणेश महासंगाचे अध्यक्ष अशोक अण्णा पांगारकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फेस्टीवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, दिनेश फलके, राजेंद्र राख, किरण गरड, अशोक उबाळे, शरद देशमुख, प्रा. राजेंद्र भोसले, फेस्टीलचे माजी अध्यक्ष साईनाथ पवार, गणेश फेस्टीवलचे माजी कार्याध्यक्ष सुरेश मुळे, जगन्नाथ काकडे पाटील, योगेश गरड, चंद्रशेखर वाळिंबे, सगिर अहेमद म ाऊली कदम, सतीश देशमुख, अशोक पडूळ, योगेश पाटील, संजय देशमुख, संजय देठे



आनंद कुंडलिकर, अशोक आगलावे, शक्ती राजपूत, मंगेश देशमुख, प्रवीण शर्मा, सोनु नन्नवरे आदींसह गणेश भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री. राजेंद्र गोरे म्हणाले की, तो इतिहास आठवला की आजही अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाहीत. गणेश महासंघाचे पदाधिकारी आम्हाला काहीही भाव देत नाहीत, आम्हाला विचारात नाहीत, असे वाटायचे परंतू नंतरच्या काळात डॉ. संजय पाटील यांनी मनावर घेतले आणि जालना गणेश फेस्टीवल अस्तित्वात आला. त्यानंतरच्या कार्यकाळातही या फेस्टीवल मध्ये बरेच चढ उतार पाहायला मिळाले. नंतर या फ ेस्टीवलमध्ये काळानुरुप बरेच बदल झाले. परंतू ते सर्वाअर्थाने योग्य होते, असे सांगून श्री. गोरे यांनी चमनचा राजा आणि गणेश महासंघाबद्दलही आपल्या भाषणातून माहिती दिली.यावेळी अशोक पांगारकर यांनी आपले म नोगत व्यक्त केले.

## विद्यार्थी, पालकांनी काळाची पावले समजावून सतर्क राहावे - सपोनि खामगळ

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथून जवळच असलेल्या नळवहिरा येथे,आपल्या पाल्यांचे शिक्षण चांगले होण्यासाठी प्रत्येक पालक अगदी जीव ओतून प्रयत्न करीत असतो. पण समाजात निरागस शालेय विद्यार्थ्यांसोबत ज्या घटना घडत आहे त्या मानवी वर्तनाला काळिमा फासणाऱ्या आहेत. अशा घटना आपल्या शालेय परिसरात, गावात कुठेही घडू नाही, यासाठी काळाची पावले ओळखून विद्यार्थ्यांसोबतच पालक व शिक्षकांनी सजग आणि सतर्क राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांनी व्यक्त केले. जाफराबाद तालुक्यातील नळविहिरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत पोलिस काका-दीदी उपक्रमांतर्गत विद्यार्थी म ार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी सरपंच सोपान जंजाळ, शालेय समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर, मुख्याध्यापक एस. के. नागरे, आकाश वाकोडे, नंदू गाडेकर, परसराम गाडेकर, विष्णू जंजाळ, पोलिस कर्मचारी गजेंद्र भुतेकर, अमोल शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सावता तिडके यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक डी. आर. मुनेमाणिक, प्रम ोद कळंबे, भाऊसाहेब जाधव, सुनीता खलसे, मंजूषा बकतकार, पूजा गहेरवाल यांच्यासह आदींनी पुढाकार घेतला.

## मनशांतीसाठी कथांचे श्रवण आवश्यक

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** भागवत कथा दरम्यान, भागवत कथेच्या श्रवणाने जीवनाचे सोने होते. या कथेमध्ये जगावं कसं यासोबतच मरावं कसं याचंही गुपित सांगितलेलं आहे. मरताना जो आनंदाने मरतो तोच खरा स्वर्गीय सुखास पात्र होतो. ही कथा आम्हास सुखाच्या मरणाचं सूत्र सांगून जाते. कलियुगात भगवंत प्राप्तीचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण व धर्म कथांचे श्रवण हाच होय. जीवनातील व्यथा जर संपवायच्या असतील तर प्रत्येकाने अशा धर्मकथांचं श्रवण केलं पाहिजे, असे मत संत जनार्दन स्वामी संप्रदायातील गोपेश्वर महादेव मंदिराचे प्रमुख भागवताचार्य राघवगिरी महाराज यांनी व्यक्त केले. टेंभुर्णी येथील महालक्ष्मी महिला भागवत सेवा समितीतर्फे संत सावता मंगल कार्यालयात २१ ऑगस्टपासून आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत संगीत कथेचे वाचन करताना ते भाविकांना संबोधित करीत होते. या कथेचा समारोप २७ ऑगस्ट रोजी महाप्रसादाने होणार आहे. या कथेसाठी कुसुम पंडित, पार्वती डोईफोडे, मंडाबाई डोमळे, आशा तांबेकर, वंदना डोईफोडे, कल्पना डोईफोडे, शोभा घोडके, सुमनबाई तिकटे, कुंता गीते, मुक्ता नवले, प्रतिभा डोमळे, रंजना डोमळे, राधाबाई दहिवाल, रूपाली तांबेकर, कांताबाई भोपळे हे उपस्थित होते.

# प्रहार संघटनेचं जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रतिकात्मक तिरडी आंदोलन

### स्मशानभूमीचा रस्ता करून देण्याची ग्रामस्थांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** प्रहार संघटनेच्या वतीनं जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रतिकात्मक तिरडी आंदोलन करण्यात आलं. अंबड तालुक्यातील लालवाडी येथे स्मशानभूम ीसाठी रस्ता नाही. त्यामुळं पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी ग्रामस्थांचे हाल होत आहेत. त्यासाठी ग्रामस्थांनी प्रशासनाला रस्ता करून देण्यासाठी अनेक निवेदनं दिली. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळं दिनांक २७ सोमवार रोजी एक वाजेच्या सुमारास प्रहार संघटनेनं आक्रमक होत.

जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रतिकात्मक तिरडी आंदोलन केलं. दरम्यान प्रशासनानं स्मशानभूमीचा प्रश्न तात्काळ सोडवावाअन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंत्यविधी करण्यात येईल असा इशारा यावेळी प्रहार संघटनेकडून देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की मौजे लालवाडी येथील स्मशानभुमी बांधकाम आज पर्यंत मंजूर झालेले नाही. अनेकवेळा ग्राम पंचायल लालवाडीच्या वतीने आपल्या विभागाला प्रस्ताव सादर केलेले आहे. आजच्या परिस्थितीत मौजे लालवाडी येथील जनतेची स्मशानभुमी बांधकाम नसल्यामुळे अत्यंत दयनिय अवस्था झालेली आहे. परीणामी पावसाळ्याम ध्ये आपआपल्या शेतात अंत्यसंस्कार करण्यासाठी पावसात चिखल तुडवत जावे लागते,

मागील अनेक वर्षापासून आपल्या विभागाला ग्रा.मा. नं. १३६ व ग्रा.मा. नं. १६ हे दोन रस्ते खडीकरण करण्यासाठी निवेदन दिलेले आहे रस्त्या



अभावी लालवाडी गावातील शेतकऱ्यांना शेतातील फळबाग जाग्यावर पडया भावात विकावे लागत आहे.

रस्ता नसल्यामुळे पाणी असून देखील ऊस लागवड करता येत नाही. त्यामुळे आपण या प्रश्नकडे लक्ष देऊन आमचे वरील कामे जिल्हा नियोजन, जनसुविधा ३०-५४, २५-१५, व शासनाचा कुठल्याही नियोजनामधून आपल्या स्तरावरुन मंजूर करुन दयावे.

प्रशासनानं स्मशानभूमीचा प्रश्न तात्काळ सोडवावाअन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंत्यविधी करण्यात येईल असा इशारा यावेळी प्रहार संघटनेकडून देण्यात आला आहे.

यावेळी प्रदिप शिंदे, सावळा हरी शिंदे, जगन ठाकूर, सुदाम इंगोले, सुनील पंडित, सिद्धेश्वर पाटील, लखन शिंदे, नासिर पटेल, भाऊसाहेब शिंदे, कृष्णा शिंदे, जगन्नाथ कदम, कारभारी पवार, संतोष जाधव, करण चव्हाण, संदीप गावडे, दत्ता मुळे सह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.